# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १० एप्रिल २००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक १० एप्रिल २००४ रोजी (दि.०६.०४.२००४ ची तहकूब सभा) मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिशन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील '' प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी १२.३२ वाजता '' वंदेमातरम् '' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त,संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री .घोडेले नंदकुमार राधाकिसन
०३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०७. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०८. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
०९. स.स.श्री.राजू रामराव शिंदे
१०. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
११. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१३. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१४. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१५. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१७. स.स.श्रीमती आशा बिनवडे
१८. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२०. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२२. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२३. स.स.श्री.नजर हमीद अ.गफ़ुर
२४. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२५. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
२६. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२७. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
२८. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
२९. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३०. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यारखान

३१. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३२. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३३. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३४. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३६. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
३७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
३८. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
३९. स.स.श्री.तायडे पांडूरंग यशवंतराव
४०. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४१. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४२. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४३. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४४. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४५. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४६. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.स.श्री.अ.कदिर मौलाना सय्यद
४८. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४९. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
५०. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५१. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५२. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५३. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५४. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५५. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५६. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५७. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
५८. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५९. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६०. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६१. स.स.श्री.अजिजखान गणीखान
६२. स.स.श्री.अफसरखान यासीनखान
६३. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६४. स.स.श्री.शे.मुनाफ़ शे.यासीन
६५. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६६. स.स.श्री.कैसर खान बद्रोद्दीन खान
६७. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६८. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६९. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
७०. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७१. स.स.श्री.तनवाणि किशनचंद लेखराज
७२. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे

०२. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर

०३. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

०४. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**विषय क्र. ३०८/१ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक ते पैठणगेट या मंजूर विकास योजना ३० मीटर (१०० फुट) रूंद रस्त्याबाबत डॉ.पसरीचा अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवाल मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात आला असता दि.१९-०९-२००३ च्या सर्वसाधारण सभेत डॉ.पसरीचा यांचा अहवाल रद्द केला (जो की डॉ.पसरीचा यांना १०० फुट ऐवजी ७० फुट रूंद केल्यास काही हरकत नाही असा अहवाल दिला होता.)

सदर मंजूर झालेला ठराव मा.उच्च न्यायालयात सादर केला असता मा.उच्च न्यायालयाने प्रस्ताव पुन्हा सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे बाबत निर्देश दिले असता मा.आयुक्तांनी माहे ऑक्टोबर २००३ मधील सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर केला असता मा.महापौर यांना ''या विषयी दि.१९-०९-२००३ च्या सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला आहे. त्यामूळे हा विषय पून्हा सर्वसाधारण सभे समोर ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही .'' असे अभिप्राय नोंदविले. हे पाहता मा.कोर्टाने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले, ''सदर निर्णय होवू शकत नाही कारण ठराव पारित झाला असेल तर बहुमताने किंवा एकमताने हे मतदान ठेवून ठरावास घेण्यात आला असे दिसणे आवश्यक आहे. परंतू असे न होता एकदम निर्णय देवून सदर निर्णय हा ठराव असल्याचा मा.महापौरांनी निर्णय दिला.'' सदरील बाब ही सभा कामकाजा संबंधीच्या प्रकरणातील तरतुदिशी विसंगत असल्याचे मा.कोर्टाने मत दिले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने मा.आयुक्तांना एप्रिल २००४ च्या पहिल्या आठवड्यात सर्वसाधारण सभेची मिटींग आयोजित करून सदरील मिटींगमध्ये डॉ.पसरीचा यांचा अहवाल ठेवणे बाबत व त्यावर चर्चा करून मतदानासाठी ठेवणे बाबत निर्देशित केलेले आहे.

तसेच सदरील विषयी महानगरपालिकेच्या बहूमताने किंवा एकमताने पारित होणाऱ्या ठरावाबाबत मा.उच्च न्यायालयात तातडीने लेखी कळविणे बाबत आदेशित केले आहे.

करीता डॉ.पसरीचा यांचा अहवाल सर्वसाधारण सभे समोर चर्चेसाठी आणि त्या वरील विधिवत निर्णय घेण्याचा मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

श्री.भगवान रगडे : क्रांतीचौक ते किलेअर्क या रस्त्यांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी आजची सभा आयोजित केलेली आहे. या संदर्भात मला सांगावयाचे आहे व माझी सूचना आहे की, यापूर्वी सुध्दा या सभागृहात या रस्त्याच्या बाबतीत प्रस्ताव आलेला होता. मा.न्यायालयाने आदेशित केल्यामूळे पून्हः सभागृहापूढे ठेवण्यांत आले. आम्हाला सांगण्यांत आले की, १२ तारखेपर्यंत या प्रस्तावावर निर्णय घेवून मा.न्यायालयाला अहवाल सादर करण्याचे आहे. या शहराची महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थेची जी बॉडी आहे, प्रत्येक वार्डातील लोकप्रतिनिधी म्हणून स.सदस्य या सभागृहाचे सदस्य म्हणून हजर आहेत. यापूर्वी अनेकवेळा जातीधर्माच्या नावाखाली शहरात दंगली झालेल्या आहेत. शहराचे वातावरण खिन्नभिन्न झाले. या बॉडीपासून सर्व खेळीमेळीचे व शांततेचे वातावरण आहे. चांगल्या पध्दतीचे आहे. ह्या रस्त्यामूळे मज्जीद व २-३ मंदिराचा प्रश्न निर्माण झाला आहे. औरंगाबाद शहरातील शांततेसाठी, विकासासाठी अनेक जातीधर्माच्या लोकाची मने नाराज होवू नये

जाती-जातीमध्ये- धर्मा -धर्मात वाद नको. वार्डात विकासाचा उद्देश यासाठीच आपणा सर्वांना जनतेने निवडून दिलेले आहे. या शहराची शांतता राहण्यासाठी प्रयत्न असावे. माघे पाहीले तर नेहमी वातावरण चिघळायचे परंतू आता सर्व नगरसेवक शांततेसाठी पाठवलेले असावे असे मला वाटते. ही शांतता राखण्यासाठी जो मुद्दा मज्रीद व २-३ मंदिराचा असून दिनांक १२ .०४. २००४ पर्यंत मा.न्यायालयाला निर्णय कळवावयाचा आहे. डॉ.पी.एस.पसरीचा यांचा अहवालाप्रमाणे ७०' फुट रस्ता असावा, हा प्रस्ताव यापूर्वीही सादर झालेला होता त्याबाबतच चांगला निर्णय घेतला त्या पध्दतीनेच निर्णय व्हावा. हा प्रश्न एका मज्रीदचा नसून मंदिराचाही प्रश्न आहे. सर्व जाती धर्माचा प्रश्न आहे. मा.न्यायालयाचे आदेशाचे सुध्दा पालन झाले पाहिजे. तेंव्हा या विषयावर विचार विनिमय करण्यासाठी थोडाफ़ार वेळ मिळणे गरजेचे आहे. मा.न्यायालयाला विनंती करावी की, विचारविनिमय करण्यासाठी मा.न्यायालयाने वेळ द्यावा. अशी विनंती करतो.

श्री.स.अली सलामी : आजची ही विशेष सभा ज्यासाठी बोलविण्यात आलेली आहे ते डॉ.पसरीचा यांचा अहवालावर क्रांतीचौक ते किलेअर्क या रस्त्याबाबत मतदान करून घेतलेला निर्णय मा.उच्च न्यायालयाला कळविणे. असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. मा.न्यायालयाचे आदेशाचे पालन करणे आपले कर्तव्य आहे. पूर्ण भारत वर्षात लोकसभा निवडणूक होणार आहे. औरंगाबाद शहर व जिल्ह्यातही ही निवडणूक होणार आहे. व त्याचा जोर वाढत आहे. राजकीय पक्षांनी मग तो कोणत्याही पक्षाचे असो त्यांनी याचा फ़ायदा उचलू नये यासाठी निवडणूका नंतर या प्रस्तावावर निर्णय घेण्यासंबंधी मा.न्यायालयास सर्व सभागृहातर्फ़े विनंती करावी व निवडणूका नंतरचा वेळ द्यावा. दीड ते दोन महिन्याचा वेळ मिळावा अशी विनंती करण्यांत यावी.

श्री.मीर हिदायत अली : आताच या विषयावर स.सदस्य श्री.भगवान रगडे व श्री.स.अली सलामी यांनी मत मांडले. पूर्ण सभागृहाचे असे मत असावे की, या प्रकरणांत वेळ वाढून मिळावा व वेळ वाढ्वून मिळण्यासाठी सर्व संमतीने मा.न्यायालयाला विनंती करावी.

श्री.भागवत कराड :मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार आजची विशेष सभा आयोजित केलेली आहे. या प्रस्तावानूसार क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता किती फ़ुटाचा असावा, यावर चर्चा करून सभागृहाचे मत विचारलेले आहे. देश भरात व या शहरातही लोकसभा निवडणूकीचा प्रचार चालू आहे,शहरातील परिस्थिती पाहता याशहरात शांततेचे वातावरण राहावे म्हणून या सभागृहाच्या एक मताने या विषयावर निर्णय घेण्यासाठी मा.उच्च न्यायालयाकडून वेळ वाढवून घेण्यांत यावा.व हा विषय पून्हा काही दिवसांनी चर्चेला घ्यावा, अशी विनंती आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : आपण विशेष सर्वसाधारण सभा बोलविलेली आहे. डॉ.पसरीचा यांचा अहवालावर मा.न्यायालयाने मत विचारलेले आहे. ते मत आपण जरूर देवू परंतू ते मत देण्यासाठी सभागृहाच्या वतीने मी विनंती करतो की, मा. न्यायालयाकडून या संबंधी निर्णय घेण्यासाठी वेळ मागविण्यांत यावा. सर्व सभागृहाचे एकमत असेल अशी माझी खात्री आहे. हा विषय मतदानासाठी टाकावा. आवश्यकता वाटल्यास हात वर करून मतदान घ्यावे.

श्री.तकीहसन खान : या विषयावर निर्णय घेण्यासाठी मा.न्यायालयाकडून वेळ मागविण्या संदर्भात सूचना केलेल्या आहे. एकमताने सभागृह निर्णय घेत असेल तर त्याचा विरोध

करणे बरोबर नाही. न्यायालयाने वेळ दिल्यानंतर पून्हा हा ठराव सभागृहासमोर आल्यानंतर खेळीमेळीच्या वातावरणात प्रस्तावावर निर्णय घेण्यांत यावा. यानंतर मी मा.महापौर व सभागृहाला विनंती करतो की, निवडणूक होवो किंवा न हो, आपण एकमताने ठराव असा मंजूर करावा की कोणाला दु:खासह सभागृह सोडण्याची वेळ पडू नये. वारंवार सभागृहात प्रस्ताव ठेवून निर्णय न घेणे हे बरोबर नाही. सभागृहाचे एकमत असेल तर या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यासाठी वेळ मागविण्यांत यावा. सर्वांच्या सहमतीने निर्णय घेण्यांत यावा. संपूर्ण सभागृह निर्णय घेत असेल तर सर्वांच्या मताशी मी सहमत आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : ठराव मतदानास टाकण्यांत यावा. यावर हात वर करून मतदान घ्यावे.

श्री.सुनिल मगरे : मा.न्यायालयाच्या आदेशानूसार आजची सभा आयोजित करण्यांत आलेली आहे. या संदर्भात आतापर्यंत सात ते आठ वेळेस प्रस्ताव या सभागृहासमोर आलेला आहे. तरीही निर्णय झालेला नाही. म्हणून मा.न्यायालयाचे आदेशानूसार ही विशेष सभा होत आहे. या सभागृहात अनेक स.सदस्यांनी आपआपले मत मांडले आहे. विचार विनिमय करण्यासाठी आणखी मा.न्यायालयाकडून वेळ मागवून घ्यावे. अशी सूचना केलेली आहे. औरंगाबाद शहर हे अत्यंत संवेदनशील शहर म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ओळखले जाते. या शहरामध्ये अनेकवेळा जातीय दंगली झालेल्या आहेत. आणि अशा जातीय दंगलीमध्ये सर्वसामान्य नागरीक होरपळले आहेत. अनेक नागरीकांची जिवित व वित्तहानी झालेली आहे. याची जाणीव सर्वांना आहे. या सभागृहात या विषयावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी मा.न्यायालयाकडून वेळ मागवून घेण्याच्या बऱ्याच स.सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. या संदर्भात प्रशासनाने खुलासा करावा की, मा.उच्च न्यायालय या साठी वेळ वाढून देवू शकेल का, प्रशासनाचे जे प्रमुख आहेत त्यांनी किंवा जे हे प्रकरण हाताळतात त्यांनी याबद्दल माहिती द्यावी. (यावेळी मा.आयुक्त खुलासा करण्यासाठी उठतात.)

श्री.भागवत कराड : या सभागृहाचे एकमत आहे. मा.न्यायालयास या सभागृहातर्फे नम्र विनंती करावयाची आहे. सभागृहातर्फे तशी विनंती करण्याचा अधिकार आहे. असे माझे मत आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : प्रशासनाचे खुलासा करण्याची आवश्यकता नाही. मा.आयुक्तांनी खुलासा न करता जी मागणी स.सदस्यांनी केलेली आहे, ती बरोबरच आहे. ती मागणी मान्य करावी. व मा.उच्च न्यायालयाकडून या प्रस्तावावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी वेळ मागविण्यांत यावा. हात वर करून मतदान घ्यावे.

श्री.संजय शिरसाट : मा.न्यायालय या बाबतीत काय मत देईल यावर मा.आयुक्तांनी भाष्य करणे योग्य होणार नाही. खुलासा करू नये. पुढील तारीख देण्यांत यावी, अशी मा.न्यायालयाकडे मागणी करण्यांत यावी. हात वर करून मतदान घ्यावे.

श्री.भागवत कराड : मा.न्यायालय ठरविणार. आपली विनंती त्यांचेसमोर जाऊ द्यावी.

मा.आयुक्त : मी मा.न्यायालयाचे आदेश काय आहेत, ते वाचून दाखवितो.

श्री.संजय शिरसाट : सर्वांनी मत व्यक्त केले, सर्वांची विनंती आहे. तारीख देणे, न देणे हा मा.न्यायालयाचे अधिकार आहेत. मा.न्यायालयाचे काय आदेश आहेत ते विषय पत्रिकेवर आलेले आहे. आपण रूलींग द्यावी. यावर सर्वांचे एकमत आहे का, आजमावून पाहावे.

| | |
|---|---|
| मा.महापौर | : सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून मा.उच्च न्यायालयाकडे या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी पूढील तारीख मागविण्यांसाठी मान्यता असल्यास हात वर करून संमती दर्शवावी. नगर सचिव यांनी ज्या सदस्यांनी हात वर केलेले आहेत, त्यांची संख्या मोजून घ्यावी. |
| नगर सचिव | : सभागृहातील सर्वच पालिका सदस्यांनी हात वर केलेले आहेत. सर्वांचे एकमत आहे. |
| मा.महापौर | : सर्वांनी एकमताने निर्णय घेतलेला आहे, असे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावे व पुढील तारीख मागवून घेण्यांत यावी, असा एकमताने ठराव संमत करण्यांत आलेला आहे व पुढील तारीख नंतर कळविण्यांत येईल. |

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेनूसार या विषयावर निर्णय घेण्यासाठी मा.उच्च न्यायालयाकडून तारीख वाढवून घेण्याकरीता विनंती करण्यांस एकमताने मंजूरी देण्यांत आली व या विषयावर निर्णय घेण्यासाठी पुढील तारीख नंतर कळविण्यांत येईल, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद